**"वृक्षांची जोपासना हीच निसर्गाची उपासना" या योजनेंतर्गत ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये वृक्ष लागवडीचा भरीव कार्यक्रम हाती घेण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०१८/ प्र.क्र.४ /पं.रा.६**
**बांधकाम भवन, इमारत क्र.२५, मर्झबान पथ फोर्ट,**
**मुंबई- ४०० ००१**
**दिनांक: -१६ मार्च, २०१८.**

**<u>प्रस्तावना :</u>**

जागतिक उष्णतापमानात सातत्याने होणारी वाढ, हवामान आणि ऋतू बदल, दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्ष, अतिवृष्टी, पूर इत्यादी नैसर्गिक आपत्तींवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी वृक्ष लागवडीचा भरीव कार्यक्रम हाती घेणे आवश्यक असल्याची बाब जागतिक स्तरावर मान्य झाली आहे. वृक्षारोपणाचा कार्यक्रम विस्तृतरित्या राबविण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत.वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाचे लोकचळवळीत रूपांतर होण्यासाठी समाजातील प्रत्येक घटक, व्यक्ती, कुटूंब यांचा यामधील सहभाग अतिशय महत्वपूर्ण आहे.

या अनुषंगाने मु. पो. रानमळा, ता. खेड (राजगुरूनगर), जि. पुणे या गावातील ग्रामस्थांकडून जन्म, विवाह आणि देवाज्ञा या अविस्मरणीय प्रसंगांच्या निमित्ताने लोकसहभागातून वृक्ष लागवडीचा कार्यक्रम ग्रामपंचायतींच्या माध्यमातून हाती घेतला जातो. वर नमूद प्रसंगांच्या निमित्ताने प्रत्येक कुटूंबातील घराच्या आजूबाजूला, मोकळ्या जागेत, परसबागेत किंवा शेतीच्या बांधावर फळझाडांची रोपे लावून आपल्या प्रिय व्यक्तीची आठवण दीर्घकाळासाठी जपली जाते. अशा उपक्रमातून **रानमळा** हे गाव हिरवेगार आणि पर्यावरण समृध्द होण्यास मोठा हातभार लागला आहे. त्याचबरोबर कुटुंबाना कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन निर्माण झाले आहे. देशातील अनेक लोक हे हिरवेगार गाव पाहण्यासाठी भेटी देतात.

राज्यातील वनक्षेत्र २० टक्केवरून ३३ टक्केपर्यंत नेण्यासाठी **"हरित महाराष्ट्र"** हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्याला हिरवेगार आणि सुरक्षित पर्यावरणाच्या दिशेने नेण्यासाठी **रानमळा** ग्रामपंचायतीच्या धर्तीवर सर्व ग्रामपंचायत क्षेत्रांमध्ये वृक्ष लागवडीचा व्यापक कार्यक्रम हाती घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

राज्यातील वनक्षेत्र २० टक्केवरून ३३ टक्केपर्यंत नेण्यासाठी **"हरित महाराष्ट्र"** ह्या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये "वृक्षांची जोपासना हीच निसर्गाची उपासना" ही

योजना लागू करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. सदर योजना ग्रामपंचायतींमार्फत राबविली जाईल. या योजनेंतर्गत वृक्ष लागवडीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) **<u>शुभेच्छा वृक्ष</u>**:- वर्षभरात गावात जन्माला येणाऱ्या बालकांच्या जन्माचे स्वागत संबंधित कुटूंबाला फळझाडांची रोपे देऊन करण्यात यावे. अशी कुटूंबे त्या झाडांना आपल्या बाळाप्रमाणे जीव लावून त्याचे संवर्धन करतील, असे अपेक्षित आहे.

२) **<u>शुभमंगल वृक्ष</u>**:- दरवर्षी गावातील ज्या तरूणांचे विवाह होतात, त्यांना फळझाडांची रोपे देऊन शुभाशीर्वाद द्यावेत.

३) **<u>आनंदवृक्षः-</u>**दरवर्षी गावातील जे विद्यार्थी दहावी व बारावी परिक्षा उत्तीर्ण होतील,गावातील ज्या तरुण / तरुणींना नोकऱ्या मिळतील आणि गावातील जे उमेदवार विविध निवडणूकांमध्ये विजयी होतील, अशा आनंदाच्या क्षणी त्यांना फळझाडांची रोपे देऊन पुढील वाटचालीसाठी शुभाशीर्वाद द्यावेत.

४) **<u>माहेरची झाडी</u>**:- गावातील ज्या कन्यांचे विवाह वर्षभरात होतात त्या सासरी गेलेल्या असतात. त्यांना सासरी जावून झाडाचे रोप देणे अवघड असते. म्हणून या विवाहित कन्यांच्या माहेरच्या लोकांनी फळझाडांची रोपे देऊन त्यांना शुभशिर्वाद द्यावेत. आपल्या लेकीप्रमाणेच माया देऊन त्या झाडाची संबंधित कुटुंब संगोपन करतील, असा विश्वास आहे.

५) **<u>स्मृती वृक्ष</u>**:- एखाद्या गावामध्ये ज्या व्यक्तींचे वर्षभरामध्ये निधन होते, त्या कुटूंबाला फळझाडाचे रोप देऊन श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी. सदर कुटुंब झाडाच्या रूपाने आपल्या प्रिय व्यक्तीच्या स्मृतींचे जतन करतील.

**<u>रोपांची उपलब्धता</u>**:- वरील उपक्रम राबविण्यासाठी समाजातील पर्यावरण प्रेमी व्यक्ती, दानशूर लोक आणि सीएसआर यांच्याकडून देणगी रूपाने फळझाडे मिळवता येतील. तसेच वन, सामाजिक वनीकरण आणि एफडीसीएम यांच्यामार्फत देखील वनमहोत्सव कालावधीत सवलतीच्या दराने रोपांची उपलब्धता करून घेता येईल. याशिवाय खासगी रोपवाटिकांमधून देखील रोपांची उपलब्धता होऊ शकेल. यासाठी आवश्यक असणारा निधी ग्रामपंचायतींनी त्यांच्याकडे उपलब्ध होणाऱ्या उत्पन्नाच्या स्त्रोतातून भागवावा.तसेच ग्रामपंचायतीच्या ग्राम निधीमधून देखील हा खर्च भागविण्यास निधी उपलब्ध करून घेता येईल.

**<u>रोपांच्या वाटपाचा कालावधी</u>**:- मागील वर्षाचा दि. १ जुलै ते चालू वर्षाचे ३० जून हे वर्ष गृहित धरून जन्म, विवाह आणि देवाज्ञा या प्रसंगांचे औचित्य साधून किती झाडांची रोपे वाटावे लागतील, याचा अंदाज ग्रामपंचायतींनी घ्यावा. त्यानुसार दि. १ जुलै रोजी वर्षातून एकदाच रोपांचे वाटप करण्यात यावे.

**वृक्षदिंडी**:- वर नमूद केल्याप्रमाणे रोपांचे वाटप करण्यापूर्वी वृक्षदिंडी काढण्यात यावी. ग्रामस्थ आणि शालेय विद्यार्थी यांना वृक्षदिंडीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी करून घ्यावे.

**रोपांचे वाटप व वृक्ष लागवडीची नोंद**:- दि. १ जुलै रोजी सभास्थानी वृक्षदिंडी आल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते रोपांचे वाटप करण्यात यावे. रोपांचे वाटप करण्यापूर्वी ज्या कुटुंबात रोपांचे वाटप करावयाचे असेल, त्यांना किमान ४ ते ६ दिवस आधी टोकन दिले जावे. त्यामुळे कमी वेळात व्यवस्थितरित्या रोपांचे वाटप होऊ शकेल. तसेच संबंधित कुटूंबांनी अशी झाडे दि. १ जुलै ते ७ जुलै या कालावधीत लावल्याबाबत योग्य ती नोंद ग्रामपंचायत रजिस्टरमध्ये वृक्ष नोंदवहीमधील फॉर्म क्र. ३३ मध्ये ठेवावी.

**पर्यावरण प्रतिज्ञा**:- पर्यावरण संवर्धन आणि सुरक्षिततेबाबत सामुदायिक प्रतिज्ञा घेतली जावी.

वर नमूद सुखदु:खाच्या प्रसंगी गावातील ग्रामसेवक / सरपंच यांनी संबंधित कुटुंबियांची भेट घेऊन प्रसंगानुरुप त्यांचे अभिनंदन किंवा सांत्वन करावे.

वरीलप्रमाणे योजना राबवून कुटूंबातील सुख दु:खाची आठवण वृक्षारोपण, संरक्षण, देखभाल व संवर्धनाद्वारे जपणे आणि त्यातून समृध्द पर्यावरण निर्मितीच्या दिशेने काम केले जावे.

हा शासन निर्णय महसूल व वन विभागाच्या (कार्यासन फ-११) सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१८०३१५१२४८०११४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aseem Gupta

Digitally signed by Aseem Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Gupta
Date: 2018.03.17 11:42:27 +05'30'

**( असीम गुप्ता )**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत**:-

१. मा.मुख्य सचिव.

२. मा. मुख्यमंत्र्याचे अप्पर मुख्य सचिव.
३. सर्व प्रशासकीय विभागांचे अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव.
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. सर्व विभागीय आयुक्त.
७. सर्व जिल्हाधिकारी.
८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
९. सर्व आयुक्त, महानगरपालिका
१०.प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित,नागपूर.
११.प्रधान मुख्य वनसंरक्षक, (उत्पादन व व्यवस्थापन), व ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नोडल अधिकारी, नागपूर.
१२.सर्व प्रधान मुख्य वनसंरक्षक.
१३.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१४.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१५.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मुख्यालय), सामाजिक वनीकरण, पूणे.
१६.सर्व अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक.
१७.सर्व प्रशासकीय विभागांतर्गत विभाग प्रमुख.
१८. सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक).
१९.सर्व प्रकल्प संचालक व मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव).
२०.सर्व वनसंरक्षक,सामाजिक वनीकरण.
२१.सर्व उप वनसंरक्षक (प्रादेशिक).
२२.सर्व मुख्याधिकारी, अ वर्ग नगरपालिका.
२३. सर्व विभागीय वनाधिकारी, सामाजिक वनीकरण.